Disha

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धी पत्रक

## ❖ मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील शिक्षकांची प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांतील शिक्षकांसाठी मंगळवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी महापालिका मुख्यलात एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. शिक्षण विभागाच्या सेंटर ऑफ एक्सलन्सच्या माध्यमातून अंतरंग फाउंडेशनच्या सहकार्याने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना करिअर निवडण्यासाठी कसे मार्गदर्शन करावे याचे प्रशिक्षण या कार्यशाळेत देण्यात आले आहे.

मिरा भाईंदर महापालिकेच्या एकूण ३६ शाळा आहेत. या शाळांत सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेत असतात. त्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबर त्यांचे करिअर घडावे यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. शिक्षण विभागाच्या सेंटर ऑफ एक्सलन्सच्या माध्यमातून अंतरंग फाउंडेशनच्या वतीने शिक्षकांची एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा मंगळवारी महापालिकेच्या मुख्यालयातील स्थायी समिती सभागृहात संपन्न झाली. या कार्यशाळेत महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ४, १०, १४, १९ आणि ३५ मधील इयत्ता नववी आणि दहावीचे शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना योग्य करिअर मार्गदर्शन कसे द्यावे? करिअर नियोजन कसे करावे? तसेच कोणते घटक विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे ठरतात? यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान शिक्षकांना रुची, क्षमता आणि वास्तविकता या मानसशास्त्रीय (सायकोमेट्रिक) चाचण्यांबाबत प्रात्यक्षिकांद्वारे माहिती देण्यात आली. या चाचण्यांमुळे विद्यार्थ्यांच्या आवडी आणि योग्यतेनुसार त्यांचे करिअर मार्गदर्शन कसे करावे याचे तंत्र शिक्षकांना सांगण्यात आले. उपायुक्त प्रसाद शिंगटे यांनी देखील या प्रशिक्षण सत्रात शिक्षकांना मार्गदर्शन केले.

महापालिका शाळेच्या शिक्षकांनी या प्रशिक्षण सत्रात उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. यशस्वी आयोजनासाठी सेंटर ऑफ एक्सलन्सचे आणि महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. या कार्यक्रमात सहायक आयुक्त दीपाली पोवार उपस्थित होते. अंतरंग फाउंडेशनतर्फे सोनल घोडगे, नम्रता किशन, नफासत शेख, सोनिया पाटील, श्रद्धा आणि सुनील सिंग आदी सहभागी झाले होते.